"मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन" - (कालावधी 2012-2022)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत

अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या

शोध प्रबंधाचा पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

सुर्यवंशी स्वाती यशवंतराव

एम. ए.(हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र)

डी.टी. एड., बी.एड., एम.एड., एम.लीब. & इन्फो. सायन्स., एम.एस.डब्ल्यू.

मार्गदर्शक

डॉ. कंधारे विश्वनाथ गोविंदराव

(अर्थशास्त्र विभाग)

सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक

वैा धुंडा महाराज देगलुरकर कॉलेज, देगलूर ता. देगलूर जि.नांदेड

संशोधक केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

सप्टेंबर 2023

प्रस्तावना (Introduction) :

भारतातील समाजाचे आकलन करण्यासाठी जात केंद्रित अभ्यासाची आवश्यकता भासते. भारतात जनगणनेची कार्य ब्रिटिश राजवटीच्या काळापासून सुरू झाले. लोकसंख्येला एक सामाजिक व शक्ती म्हणून लोकशाही व्यवस्थेत महत्तव प्राप्त झाले आहे. वेगवेगळे समाज घटक राजकिय संस्था आणि राजकिय पक्ष या अस्पृश्य जाती एकजिनसी शक्ती समजून आपल्या उपयोगासाठी आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात.

भारतीय समाजव्यवस्थेत जवळ - जवळ आठ हजार जाती अस्तित्वात आहेत मात्र डॉ. श्री. व्य. केतकर यांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेत एकूण चार हजार जाती आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत जातीच्या निर्मितीच्या संदर्भात सूक्ष्म अभ्यास केल्यास असे दिसून येते की, समाजव्यवस्थेत जातीची निर्मिती केंव्हा इ आली हे सांगता येणे फारच कठिण आहे.

जात या शब्दाला पर्यायी शब्द इंग्रजीत caste हा शब्द वापरला जातो परंतु caste हा शब्द casta या शब्दाचा अर्थ प्रजाती किंवा जन्मभेद असा होतो म्हणून जात ही जन्मभेदाच्या आधारावर निर्माण झालेली व्यवस्था होय असे म्हणता येईल. म्हणून मातंगाचा सामाजिक उगम, परंपरा, रुढी धर्मकांड, व्यवसाय आणि जातीय अधिक्रमातील सामाजिक स्थान यावर पुरेशा प्रमाणात संस्कृतीपर वर्णनपर वाङमय उपलब्ध आहे. रसेल आणि हिरालाल यांच्या मते मातंगाचा खरा उगम कोठून झाला हे अस्पष्ट आहे. तथापि प्रजेतील जनजातींमधून त्यांचा उगम झाला असावा आणि आता त्यांचा व्यवसाय झालेली हलकी कामे अंगीकारल्यामूळे त्यांची जाती झालेली असावी.

मांग हे मातंग म्हणूनही ओळखले जातात आणि ते महाराष्ट्राच्या दर्शनकेमध्ये मांग, मातंग, मायनी, मडागी, दख्खनी मांग, राधे मांग, मांग गारोडी, म्हणून अधिसूचित करण्यात आलेली आहे. संपूर्ण राज्यभर जरी त्यांचे अस्तित्व असले तरी प्रामुख्याने राज्याच्या पुणे,

अहमदनगर, सोलापूर, नांदेड, परभणी, औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्हयांत एकवटलेली आहेत. संस्कृत वाङमयात त्यांचा उल्लेख मातंग या नावाने केलेला आहे. आधुनिक प्रचलित असलेल्या त्यांच्या मांग या नावाची व्युत्पत्ती त्या संस्कृत नावातून आलेली असावी असे मानले जाते. तथापि मांग या शब्दाचा अर्थ भिक्षा मागणे असा आहे आणि भिक मांगणे हा त्यांच्या व्यवसायापैकी एक व्यवसाय आहे. आजच्या संदर्भात मांग हे विविध व्यवसायामध्ये आढळून येत असले तरी परंपरेने मांग हे कसरतीचे खेळ करणारे आणि त्यांची बायकामुले शेतमजूर असल्याचे या जातीत दिसते. त्याचप्रमाणे मातंग समाजाच्या सामाजिक दर्जाच्या बाबतीत विचार करता सर्वात खालच्या स्तरावर असल्याचे जाणवते. कारण मातंग समाज हा शैक्षणिक व आर्थिक दृष्टया अतिशय मागासलेला आहे. शैक्षणिक व आर्थिक मागसलेपणाची जी मुख्य कारणे आहेत त्यापैकी एक कारण त्यांच्यापैकी मोठ्या प्रमाणातील लोक दोरखंड वळणे, झाडू आणि ढोल तयार करणे यासारखी पारंपारिक व्यवसाय करु उपजिविका भागवत असतात. त्याशिवाय राज्याच्या ग्रामीण भागात राहतात.

<u>संशोधन साहित्याचा आढावा</u> (<u>Review of Literature</u>) :

1. त्रि.ना. अत्रे 1957 (T. N. Attre 1957) :

त्रि.ना. अत्रे या विचारवतांनी मातंग समाजाचे अध्ययन केलेले असून त्यांनी मातंग समजाविषयी आपले खालील प्रकारचे मत मांडलेले आहे.गावकीच्या कामावर महाराप्रमाणे मांगाचा साक्षीसहया क्वचितच आढळतात. दवंडीचा मजकूर तोंडाने ओरडून महार सांगतो व डफडे मांग वाजवितो. प्रेताचे सरण महार वाहतो आणि तिरडी बांधण्याची दोरी मांग पुरवितो. महाराच्या घरी लग्न निघाले तर मांगांनी खिदमत करावी. मांगाने लग्न केले तर शेला व लुगडे आणि गोंधळ जागरण घातले तर चार पैसे महाराला दयावीत. महाराने बैलावर व मांगाने हाल्यावर वरात काढावी अशा प्रकारच्या दस्तुरांवरून मूळ महार आणि मांग ही महारातून वेगळी पडलेली पोटजात असावी किंवा ती त्यांचे मागून त्यांच्या आडोशाला येवून राहिली असावी असे अनुमान निघते. थोडक्यात मांग जात महार

जातीतून वेगळी पडलेली असूनही महारांची पोटजात असावी अशाप्रकारचे मत त्रि.ना. अत्रे या विचारवंतानी मांडले आहे.

2. डॉ. सुनंदा पटवर्धन 1973 (Dr. Sunanda Patwardhan 1973) :

डॉ. सुनंदा पटवर्धन यांनी पुणे शहरातील मांग, महार, चांभार आणि लोहार अशा पाच जातींचा तुलनात्मक अभ्यास त्यांच्या "भारतातील हरिजना अंतर्गत बदल" या संशोधनात केलेला आहे. त्या आपल्या संशोधनपर ग्रंथात म्हणतात की अस्पृश्य जातीतील ज्या पोट जाती आहेत त्या निचतेची भावना आहे तशीच भावना महार, मांग व चांभार जातीत सुध्दा आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्यात एकमेंकाविषयी द्वेष भावना वैरभाव देखील आहे. त्याचबरोबर मांग समाजाचे महार समाजाशी पूर्वीपासून वैर आहे.या संशोधनात महार, मांग, चांभार ढोर व लोहार या जातीचा तुलनात्मक अभ्यास करुन मांग जातीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही असे स्पष्ट केले आहे. तसेच मांग जातीच्या व्यवसायात बदल झालेला नाही असे सांगून मांग जातीचे स्थलांतर ही झालेले नाही. अशा प्रकारचे मत मांडलेले आहे. त्याचबरोबर मांग ही जात महार, चांभार व ढोर जातीपेक्षा तुलनात्मक दृष्टिने सर्वच बाबतीत मागासलेले आहे. अशा प्रकारचे मत डॉ. सुनंदा पटवर्धन यांनी मांग, महार, चांभार, ढोर व लोहार या जातीचे अध्ययन करुन मांडलेले आहे.

3. डॉ. बी. एस. वाघमारे 1998 (Dr. B.S. Waghmare 1998) :

चर्मकार सामाजाला सांस्कृतिक वारसा असतांना त्यांची शैक्षणिक प्रगती चांगली असूनही या समाजामध्ये असलेल्या कुचकामी व दिशाहीन नेतृत्वामुळे चर्मकार समाजाचा आर्थिक विकास खुटला असल्याचे मत डॉ. बी.एस. वाघमारे या संशोधकांनी व्यक्त केले आहे.डॉ. वाघमारे यांनी मातंग समाज विषयीच्या अध्ययनात चर्मकार समाज हा मागासवर्गीयात पुढारलेला आहे. मांग चर्मकार यांनी पारंपारिक व्यवसाय सोडला नाही. परंतु शैक्षणिक सुधारणे बरोबर चर्मकारांच्या व्यवसायात बदल वाटू लागल्यामुळे चर्मकार समाजाचे शहराकडे स्थलांतर वाढले. शहरांमध्ये गेल्यामुळे चर्मकारांची शैक्षणिक स्थिती सुधारली पण दिशाहीन नेतृत्त्वामुळे त्यांचा आर्थिक विकास म्हणावा तेवढा झालेला नाही.थोडक्यात बदलत्या सामाजिक परिस्थितीमध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक बदल घडून आला, पण निष्क्रिय पुढारी व नेत्यांच्या दिशाहिन वर्तनामुळे त्यांच्या विकासात अनेक

समस्या निर्माण झाल्याची खंत डॉ. बी. एस. वाघमारे यांनी आपल्या संशोधनात्मक ग्रंथात मांडलेले आहे.

4. डॉ. सुरेश वाघमारे 1982 (Dr. Suresh Waghmare 1982) :

डॉ. सुरेश बी. वाघमारे यांनी मातंग समाजाचे अध्ययन त्यांच्या एम.फिल.च्या " शिराढोण गावात मांग समाजातील धार्मिक बाबतीत झालेला बदल" या प्रबंधाच्य माध्यमातून केलेले आहे. त्यांनी मांग समाजाच्या बाबतीत पुढील प्रकारचे मत मांडले आहे. मातंग समाजात संयुक्त कुटुंब पध्दतीत मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. त्यांच्यात मोठया प्रमाणात निरक्षरता असून 36 ते 60 वयोगटातील कुटुंब प्रमुखात प्रामुख्याने पूर्णतः निरक्षरात आहे. तसेच मोठया प्रमाणात मांग कुटुंबाचे लोक पारंपारिक व्यवसाय करतात. सर्व मांग कुटुंबे ही भूमिहीन आहेत. मांगाच्या घराची रचना मांग वस्तीत त्यांच्यातील तीन उपजातीनूसार केलेली असते. त्यांची घरे चांगली नसतात. घरबांधणीसाठी अतिशय हलक्या प्रतिच्या वस्तूंचा वापर केलेला असतो.जे मांग पारंपारिक व्यवसाय करतात त्यांची घरे तुलनेने चांगली आहेत. मांग कुटुंबातील विवाह हे पारंपारिक पध्दतीने ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार होतात. नोंदणी पध्दतीनुसार विवाह होतच नाहीत. बहुपत्नी विवाहास परंपरेची मान्यता आहे. परंतु कायद्दाने बंधन असल्यामुळे त्याचे प्रमाण कमी आहे. बाल विवाहाची पध्दती आजही कार्यरत आहे. विधवा महिलेस पुनर्विवाह करण्यास मान्यता आहे. धर्मविधीच्या संदर्भात कुटुंबातील प्रमुख हा पत्नीचा मालक असतो. आर्थिक बाबतीत मात्र पत्नीचा दर्जा पती इतकाच असतो. कारण पत्नीदेखील मोलमजूरी करुन आर्थिक कमाई जवळपास पतीच्या बरोबरच करते..वरील प्रकारचे निष्कर्ष डॉ. सुरेश वाघमोर यांनी आपल्या संशोधनाच्या निष्काषांत काढलेले आहेत.

5. डॉ. प्रभाकर मांडे 1999 (Dr. Prabhakar Mande 1999):

डॉ. प्रभाकर मांडे यांनी मातंग समाजाचे अध्ययन आपल्या "मांग आणि त्यांचे मांगते" या पुस्तकात केलेले आहे. त्यांनी त्या पुस्तकाद्वारे असे स्पष्ट केले आहे की, मातंग समाजाकडे सवर्ण लोक हे शुभजातया दृष्टीने पाहतात. कारण पेरणी करतांना, पांडव पूजा (खूळपूजा) करतांना मांगाची आवश्यकता अस महत्वाच्या कामासाठी जातांना, उठल्याबरोबर मांगाचे तोंड पाहावे असेही त्यांची समजूत आहे. तर नवनिर्मितीचे सर्व विधी

मांगाच्या हाताने होत. परंतु मांगाचे आजचे संपूर्ण समाजव्यवस्थेतील स्थान अतिशय गौण अशा स्वरुपाचे आहे. त्यांचे दारिद्र्य वाढत आहे. जर मातंग समाजाचा विकास करावयाचा असेल तर मातंग समाजाला शासकिय आरक्षणाच्या बाबतीत लोकसंख्येच्या प्रमाणात वेगळा सहभाग हावा. त्याशिवाय आजच्या वाईट परिस्थितीमधून मातंग समाज बाहेर येणे अशक्य असेच आहे. आशा प्रकारची भूमिका मातंग समाजामध्ये उदयास येत आहे. या प्रकारची भूमिका डॉ. प्रभाकर मांडे यांनी त्यांच्या अध्ययनात स्पष्ट केली आहे.

संशोधन समस्या निवड (Research problem selection):

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे ज्यात विविध जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. धर्मनिरपेक्षता हा भारतीय व्यवस्थेचा कणाच होय. तरी देखील वैदिक काळापासून ते आजतागायत जाती व्यवस्था भारतात टिकून आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची संख्या 59 आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, राज्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या 1, 32, 75, 898 (11.81%) असून त्यात पुरुष 67, 67, 759 व स्त्रिया 65, 08, 139 आहेत. भारतातील एकूण 20.14 कोटी अनुसूचित जातींपैकी 6.6% अनुसूचित जाती महाराष्ट्रात आहेत.

2001 च्या जनगणनेनुसार, अनुसूचित जातींमध्ये महार (57.5%), मांग (20.3%), भांबी/चांभार (12.5%) व भंगी (1.9%) ह्या प्रमुख चार समाजाची लोकसंख्या 92% आहे. लातूर जिल्ह्यात अनुसूचित जातींचे प्रमाण सर्वाधिक (19.4%) आहे. 2011 च्या census नुसार पुणे जिल्ह्यात सर्वाधिक अनुसूचित जातींचे प्रमाण आहे.

लोकसंख्येचे प्रमाण पाहता मातंग समाज हा प्रामुख्याने जास्त आहे. त्याचबरोबर जितकी प्रगती व विकास या समुदायाचा व्हायला हवा होता तो झालेला नाही. महिला बाबतीत तर आजही शिक्षण, दारिद्र्य, व्यवसाय, शासकीय नोकरी, संघटनात्मक ऐक्य यात इतर समुदायाच्या तुलनेत फार मोठी तफावत दिसून येते. त्याचबरोबर शिक्षणा अभावी अस्पृश्यता व अंधश्रद्धा आजही मातंग समाजाला जाणवते,

म्हणून संबंधित समाजाबद्दल संशोधन करून त्यांच्या समस्या जाणून घेणे व त्यावर काही उपाययोजना शोधता येतील का? यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे म्हणून संबंधित संशोधन विषय निवडला गेला आहे.

संशोधन विषयाचे महत्व (Importance of Study) :

स्वातंत्र्यानंतर हजारो कोटी रुपये अनुसूचित जातीच्या विकासासाठी खर्च होतात असे राजकारणी प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या मार्फत सतत सांगितले जाते. परंतु अनुसुचित जातीतील काही जातींचा अपवाद वगळता मांग जातीचा व अनुसूचित जातीच्या स्थितीत स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर फारसा बदल झालेला दिसत नाही. कारण महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणा दुसऱ्या क्रमांकावर असणारा मातंग समाज व मातंग समाजातील महिलांच्या शैक्षणिक, आर्थिक सामाजिक, राजकिय धार्मिक दृष्टया विकास झालेला नाही. म्हणून सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या अनसूचित जातींसाठीच ज्या विविध योजना व त्यावर होणारा कोटयवधींचा होणारा खर्च मातंग समाज व मातंग समाजातील महिलांच्या स्थितीत का बदल घडऊ शकला नाही. याचा अभ्यास करण्याच्या दृष्टिने संबंधित विषयाचे महत्व देश, राज्य व समाजाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वाचे आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे (Objective of Study) :

कोणतेही संशोधन कार्य करीत असताना संशोधक काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन संशोधन कार्य करीत असतो. संशोधनाला योग्य दिशा मिळावी, संशोधन हे हेतुपूर्ती करणारे असावे असे अपेक्षित असते. यासाठी प्रस्तुत संशोधकाने सदरील संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे मांडली आहेत.....

1. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.

2. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या दारिद्र्याचा अभ्यास करणे.

3. मराठवाड्यातील मातंग समाजाच्या शासकिय योजनेतील सहभागाचा अभ्यास करणे

4. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

5. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या शासकीय नौकरीतील स्थितीचा अभ्यास करणे.

6. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांचे व्यावसायिक स्थान अभ्यासणे

7. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या सामाजिक व धार्मिक स्थितीचे अध्ययन करणे

8. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या संघटनात्मक स्थितीचे अध्ययन करणे.

संशोधनाचे गृहितके (Hypothesis) :

कोणतेही संशोधन कार्य करताना गृहीतकांची मांडणी करावी लागते. त्याशिवाय संशोधन करता येत नाही. वस्तुस्थितीला विचारलेला प्रश्न म्हणजे गृहीतके होय. म्हणून गृहीतकृत्यांचे सामाजिक संशोधनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. गृहीतके ही संशोधनास नेहमी पुढे नेतात. याच अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषयाची काही गृहीतके पुढीलप्रमाणे मांडली आहेत.......

1. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलाचे शिक्षणातील प्रमाण अल्प आहे.

2. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे..

3. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांचे अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे.

4. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलां संघटनात्मक पातळीवर सक्षम नाही.

5. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांना शासकिय योजनेचा लाभ अल्प प्रमाणात मिळतो.

6. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक समस्या जास्त प्रमाणात आहे.

7. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या शासकीय नोकरीतील प्रमाण अल्प आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology) :

कोणत्याही विषयातील संशोधन करीत असतांना ते संशोधन शास्त्रशुध्द व्हावे अचुक निष्कर्ष निघावेत, विषयाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि वस्तुस्थितीचे सत्य आकलन होण्यासाठी विषयानुरुप संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पध्दती प्रायोगिक संशोधन पध्दती, सर्व्हेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा समावेश होतो.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन पद्धती (Fact Collection Method):

सामाजिक संशोधन पद्धती ही शास्त्रीय स्वरूपाची आहे ती अनुभव प्रमाणावर आधारलेली आहे. सामाजिक संशोधनात समस्या निर्धारण झाली की त्या विषयासंबंधी तथ्य गोळा करावे लागतात. त्यानंतर संकलित केलेल्या तथ्याचे वर्गीकरण संकलन करून समस्या सोडवणूक केली जाते.

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व दुय्यम आधार सामग्री (Primary Data and Secondary Data) यावर आधारित आहे **“मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन”- (कालावधी 2012-2022).** करण्यासाठी विशेषतः दारिद्रय, राहणीमान, व्यवसाय, रचना, कौटुंबिक स्थिती, रुढी, परंपरा, शासकिय योजनांचा लाभ इत्यादी घटकाचे सखोल अध्ययन करण्यासाठी मुलाखत अनूसूचि/प्रश्नावली तयार करुन, त्याद्वारे प्रत्यक्ष भेटून निरीक्षण व मूलाखतीच्या साहाय्याने प्राथमिक माहिती संकलित करण्यात येईल.

तसेच दुय्यम सामग्रीचाही आधार प्रस्तुत संशोधनात घेण्यात येणार आहे. यामध्ये समाज परिषद, मेळावे, मासिके, पुस्तके,जनगणना अहवाल,लहुजी साळवे आयोग त्याचबरोबर इतर अभ्यासकांने व संशोधकांनी केलेले संशोधन इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

नमुना निवड (Selection of Sample) :

वर्णनात्मक अध्ययनात संशोधनकर्ता निर्धारित संशोधन विश्वातील लोकांच्या बाबतीत काही विधाने करु शकतो. त्यासाठी विश्वातील प्रत्येक व्यक्तीच्या अभिवर्ती व वर्तनाची गरज असतेच असे नाही तसे पाहिले तर समाजातील प्रत्येक घटकाच्या अध्ययनाऐवजी त्यातील एककांना नमुना म्हणून निवडून अभ्यास करणे होय. या तत्वाला मार्गदर्शक ठरवून या संशोधनात नमुना निवड करण्यात येईल… त्यासाठी मराठवाड्यातील औरंगाबाद, बीड, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद,जालना,नांदेड परभणी या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातून प्रत्येकी 100 याप्रमाणे 800 कुटुंबातील महिलांची नमुना निवड करण्यात येईल. ही नमुना निवड करत असतांना गैर संभाव्यता (Non Probability) नमुना निवड अंतर्गत सोयीस्कर नमूना (Purposive Sampling Method) निवड पध्दतीचा संशोधनासाठी आधार घेण्यात येईल.

संशोधनाचा कालावधी (Research Duration) :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या उद्दिष्टानुसार अभ्यास करण्यासाठी 2012-2022 हा दहा वर्षाचा कालावधी निवडला असून या कालावधीमध्ये मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यात येणार आहे.

व्याप्ती आणि मर्यादा (Scope and Limitation of the Study) :

महाराष्ट्र राज्यात एकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मातंग समाजाची लोकसंख्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील मातंग जातीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक समस्या संदर्भातील अध्ययनाची आवश्यकता आहे. त्यामुळे मराठवाड्यातील एकूण सर्वच जिल्ह्याची निवड संशोधनासाठी करून पूर्ण मातंग समाजाचे प्रतिनिधित्व कशाप्रकारे करता येईल याचा संशोधक प्रयत्न करेल.

मातंग समाज हा मोठ्या प्रमाणात निरक्षर व ग्रामीण भागात वास्तव्यास राहात असल्यामुळे त्यांच्याकडून दिली जाणारी पारंपारीक व सांख्यकिय माहीती ही ढोबळ असणार आहे. ही जरी संशोधनाची मर्यादा असली तरी सुध्दा संशोधक याची जाणीव ठेवून संशोधक उत्तरदात्याकडून माहिती वास्तविक व संशोधनाला परिणाम कारक होईल या पध्दतीनेच संकलित करेल……. थोडक्यात संशोधन व्याप्तीमध्ये संपूर्ण मराठवाड्यातील आठ जिल्ह्याच्या समावेश करण्यात येणार आहे तर प्रस्तुत संशोधन हे केवळ मराठवाडा विभागापुरतेच मर्यादित असेल.

प्रकरणाची रूपरेषा :

1. प्रस्तावना.
2. संशोधन साहित्याचा आढावा.
3. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांची सामाजिक स्थिती.
4. मराठवाड्यातील मातंग समाजातील महिलांची आर्थिक स्थिती.
5. निष्कर्ष व शिफारशी.

***** संदर्भ ग्रंथ ******

1. Caste and Philosophy in per -Buddhist India by Dr. B.R. Kamble , Parimal Prakashan , Aurangabad ,P. No 10 to 15, 1979.

2. Caste in India by J.H. Hutton Oxford University Press, Bombay , P.no.47,1963.

3. The other Dalit voice in Indian Politics, Dr.B.S. Waghmare, Kalpana Prakashan, Nanded.1998

4. 'आर्थिक संकल्पना'. डॉ. विनायक गोविलकर, डायमंड पब्लिकेशन्स, 1691, पुणे प्रथम आवृत्ती, मार्च 2008.

5. चेंज इन द रिलिजन सिटी अमंग द मांगस ऑफ शिरढोण, डॉ. सुरेश वाघमारे, एम. फिल. लघुशोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

6. चेंज समोर इंडिया हरिजन, पिएच. डी. प्रबंध शोध पुणे विद्यापीठास सादर 1973

7. गावगाडा, त्रि.ना., 4 अत्रे. वि. मोटे, प्रकाशन, मुंबई, 1957.

8. 'भारतीय अर्थव्यवस्था', डॉ. के. एच. शिंदे, सेठ प्रकाशन, ठाणे, प्रथम आवृत्ती, सन 2006.

9. भारतीय अर्थव्यवस्था, रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन पुणे, चौदावी आवृत्ती 2023

10. मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन, गोयल सुरेंद्रकुमार, पद्म प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 1998.

11. मांग आणि मांगते, सविन प्रकाशन मंगल प्रभा 109,

12. mr.m.wikipedia.org

मार्गदर्शक

संशोधक

डॉ. कंधारे विश्वनाथ गोविंदराव
सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक
(अर्थशास्त्र विभाग)
कै.धुंडा महाराज देगलूरकर कॉलेज, देगलूर
ता. देगलूर जि. नांदेड

सुर्यवंशी स्वाती यशवंतराव
एम. ए.(हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र)
डी.टी.एड., बी.एड., एम.एड.,
एम.एस.डब्ल्यू., एम.लीब. & इन्फो. सायन्स.,